स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानव्यविद्या शाखे अंतर्गत समाजशास्त्र विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी)

पदवीसाठी सादर करावयाचा संशोधन आराखडा

संशोधनाचा विषय

महानुभाव पंथीयांचे समाजशास्त्रीय अध्ययन:

विशेष संदर्भ जालना जिल्हा

संशोधक

मनिषा गजाननराव अंबिलवादे

एम.ए.एम.एड.

मार्गदर्शक

डॉ.एम.एम.गायकवाड

(सहाय्यक प्राध्यापक)

स्माजशास्त्र, विभाग प्रमुख

स्वामी विवेकानंद महाविद्यालय, मुक्रमाबाद,

ता.मुखेड जि.नांदेड

एप्रिल — २०२५

महानुभव पंथीयांचे समाजशास्त्रीय अध्ययन:

विशेष संदर्भ जालन जिल्हा

प्रस्तावना:

इतिहासाची ज्ञात अज्ञान पाने उलटुन जेव्हा आपण १२व्या शतकात प्रवेश करतो, तेव्हा आपणास समाजातील चित्र वेगळया स्वरूपात दिसू लागते. आर्थिक दृष्टीने पिचलेल्या विविध व्रतवैकल्य परंपरा यात दबलेल्या विविध देवदेवतांच्या आहारी गेलेल्या आणि कर्मकांडामध्ये अडकलेल्या समाज आपल्यासमोर दिसु लागतो. जाती व्यवस्थेचे प्रचंड थोब असलेल्या समाजाचा अकराव्या बाराव्या शतकाचा कालखंड म्हणजे सामान्य माणसाला माणुस म्हणुन जगता येऊ नये असा काळ दिवतो. स्त्रियांची देणे दयनीय अवस्था, वर्ण व्यवस्था यात हा समाज पुर्णत: दबलेला शोषित समाज होता. धर्माच्या अंतरंगाचा विसर पडून त्यांच्या बाह्य रंगावर सर्वांचा दृष्टिकोन राहिला होता. या काळात जैन व वीरशैव सारखे पंथ चातुर वर्णीय व्यवस्थेचा विरूध्द काम करत होते. भारतातील सर्वत्र पाहता ही परिस्थिती दिसुन येते विविध राज्यकर्त्यांच्या नियंत्रणाखाली असणारे राज्य आणि जनता यांची स्थिती दैनिय झाली होती. महाराष्ट्र हा यादवकालीन राजवटीखाली होता. इतर राज्याच्या तुलनेत महाराष्ट्राची स्थिती ही सामान्य होती. त्या काळातील हेमाद्री पंडित, सिंघल देव यादव, महादेव यादव, अमन देव यादव आणि रामदेव यादव शासकांचा काळ होता. याच काळात १२व्या शतकात श्री चक्रधर स्वामींनी आपली परिवर्तनवादी धर्म मते महाराष्ट्रातील सामान्य जणांना सांगितले व त्यांच्या प्रसार केला. चक्रधर स्वामीं याच काळात महाराष्ट्रात होते. या सामाजिक विकृतींचा कळस झालेला पाहून त्याच्या करीता चक्रधर स्वामींनी आपल्या सामाजिक विचारांच्या माध्यमातुन या समाजातील ही विविध विषमता दुर करण्याचा प्रयत्न करून आपल्या सामाजिक अहिंसावादी, स्त्री समता करूणा, दया, क्षमा, शांती या विचारांचा प्रसार संपूर्ण महाराष्ट्रभर केला. स्वामींचे कार्य आपणास लिळा चरित्रातील लिळख क्रमांक ७ ''बाय येथे शरण आलिया काही मरण असे'' एक सश्याच्या रक्षणार्थ स्वाामींनी केलेले कार्य हे या लिळेतुन दिसुन येते. स्वामींच्या काळातील स्वामीची शिष्या पहिली स्त्री कवयित्री आज आपण जिचा गौरव करतो ती

''महदंबा'' तिचे मराठी साहित्यात प्रसिध्द असलेले ''ढवळे'' आहे. असे विविध कार्य श्री चक्रधर स्वामींनी आपल्या जीवनात केले. महानुभव पंथ हा महाराष्ट्रातील एक प्राचीन व महत्वाचा धार्मिक पंथ आहे या पंथाचे संस्थापक चक्रधर स्वामी यांनी समाजातील अस्पृश्यता, जातीयता आणि अंधश्रद्धे विरुद्ध लढा दिला. हा पंथ महाराष्ट्रा पुरता मर्यादित नसुन भारतातील पंजाब, दिल्ली या राज्यात आणि अफगाणिस्तान या राष्ट्रांपर्यंत या पंथाचा प्रचार व प्रसार झाला आहे. महाराष्ट्रातील जालना जिल्हयातील महानुभव पंथांची संख्या लक्षणीय आहे त्याकरिता महानुभाव पंथीयांचे जीवनमान सामाजिक स्थिती, सांस्कृतिक रचना व सामाजिक बदल हे समजूण घेणे समाजसशास्त्राच्या दृष्टिकोनातून महत्त्वाचे आहे. महानुभाव पंथावर होणा-या संशोधनातून नक्कीच ज्ञानाचे एक नवे दालन सर्वांसाठी खुले होईल यात शंका नाही. या सर्व बाबींचा विचार करून संशोधकाने "महानुभाव पंथीयांचे समाजशास्त्रीय अध्ययन: विशेष संदर्भ जालन जिल्हा" हा विषय संशोधनाकरिता निवडलेला आहे.

संभाव्य संकल्पना :

संशोधनाचा विषय निश्चित झाल्यावर त्यात समाविष्ट होणारया सर्व संज्ञाची व संकल्पनाची यादी तयार करावी लागती म्हणून प्रस्तुत संशोधन विषया करिता महानुभव पंथीय संत, तपस्वीनी, अनुयायी यांचे सांस्कृतिक, धार्मिक, सामाजिक, शैक्षणिक व व्यक्तीगत जीवन इ. संकल्पनांचा आवश्यकतेनुसार अभ्यास करण्यात येणार आहे.

संशोधनाचे महत्व:

ऐतिहासिक काळापासुन मानवाला दिशा देण्याकरिता, शिक्षणाकरिता, नवनवीन शोध घेण्याकरिता, विविध पंथाचे, संताांचे, धर्मांचे, समाजिक विचार समाजाला दिशा देण्याचे कार्य करतात. अकराव्या शतकातील श्री चक्रधर स्वामींचे विचार मानवतावाद व समाजकार्य तत्कालीन परिस्थितीतल उपयोगी ठरले व काळानुसार हे विचार समाज मान्य झाले व त्यातुन महानुभाव पंथाची निर्मिती झाली. महानुभव पंथाचे सामाजिक

सांस्कृतिक, धार्मिक क्षेत्रातील कार्य हे महत्वपुर्ण आहे. व या पंथाच्या कार्याचा परिणाम आजच्या समाजातील धार्मिक विधीमध्ये दिसून येतो. आजच्या धार्मिक विधीमध्ये मंदिरातील पुजाअर्चा करण्याकरिता विशिष्ट जात, धर्म असणारे पुजारी सेवक मंदिरात, आश्रमात, मठात, कार्य करतात तिथं स्त्रियांना पुजा करण्याचा अधिकार नसतो. पण श्री चक्रधर स्वामींच्या मंदिरात, मठात, पुजा या स्त्री साध्वी किंवा गृहस्थ महिला करता आणि श्री चक्रधर स्वामींच्या अनेक मंदिरामध्ये मुस्लिम धर्मातील स्त्री किंवा पुरूष हे दोघेही पूजा करतात. आजच्या काळातील धार्मिक परिस्थिती पाहता श्री चक्रधर स्वामी स्थापित महानुभाव पंथाचे विचार, व्यापक समता, मानवतेची शिकवण देणारे आहे. करीता हे कार्य अभ्यास संशोधनाचे महत्व अधोरेखित करते.

विषय निवडी मागील भुमिका : कोणत्याही क्षेत्रात संशोधन करीत असतांना ते संशोधन कशासाठी करण्यात येत आहे हा उद्‌देश डोळयासमोर ठेवुन संशोधन कार्य करण्यात येते. प्रस्तुत विषयाच्या निवडीचे कारण म्हणजे महानुभाव पंथाचे सामाजिक व मानवतावादी कार्य आजही तळागाळातील जणसामान्या पर्यंत पोहोचलेले नाही. तेव्हा त्यांचे हे सामाजिक व मानवतावादी कार्य सर्वसामान्यापर्यंत पोहचवून या समाजातील ज्या काही अनिष्ठ रुढी, प्रथा, परंपरा आहे. त्या नष्ठ करुन समाजाचा सर्वांगिण विकास कसा होईल हा प्रामाणिक हेतू डोळयासमोर ठेवून या विषयाची निवड करण्यात आली आहे.

संबंधित साहित्य व गतसंशोधनाचा आढावा:

सदरील विषयासंबंधी संशोधन करण्याच्या उद्देशाने संशोधकाने विविध संशोधन, प्रबंध, प्रबंधिका, संशोधन पुस्तिका, लीळा चरित्र, पंथीय लेख, मासिके, पुस्तके, इंटरनेट, नियतकालिके, याव्दारे विषयासंबंधी आढावा घेतला आहे. महानुभाव पंथाचे समाजिक विचार, सामकजिक परिवर्तन, मानवतावाद, स्त्रीयांविषयक कार्य यांवर समास्त्रांचे कुठेलेही संशोधन झालेले नाही. हे एक असंशोधीत क्षेत्र आहे.

संशोधनाची व्याप्ती :

सदरील संशोधनाची व्याप्ती समाजशास्त्र विषया पुरते मर्यादित आहे. प्रस्तुत संशोधनाकरीता निवडल्या विषयाची व्याप्ती विस्त्रृत स्वरूपाची आहे. महानुभाव पंथीयाचे कार्यक्षेत्र संपुर्ण महाराष्ट्रात विस्तारलेले आहे. संशोधनासाठी निवडलेल्या विषयाचा सामाजिक दृष्टिकोनातुन अभ्यास करत असताना महानुभाव पंथीयाचे सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिक, स्त्रीविषयक, शैक्षणिक कार्य इत्यादी क्षेत्रात महानुभाव पंथाचे कार्य मोठे आहे, याची चिकित्सा शोध प्रबंधात केली आहे.

उदिष्टे :

१. महानुभाव पंथीयांचे सामाजिक विचार अभ्यासणे.

२. जालना जिल्हयातील महानुभाव पंथीयाची सामाजिक व आर्थिक परिस्थिती तपासणे.

३. आधुनिकतेचा महानुभाव पंथीयावर झालेला बदल अभ्यासणे.

४. चक्रधर स्वामी यांच्या विचारामुळे स्त्रियांच्या जीवनात झालेला सामाजिक बदलांचा शोध घेणे.

५. महानुभाव पंथीयांचे मानवतावादी विचार अभ्यासणे.

गृहितके :

१.महानुभाव पंथाचे सामाजिक विचार समतावादी दिसून येतात.

२. सामाजिक व सांस्कृतिक जीवनात बदल झालेला दिसून येतो

३. स्त्रियांच्या जीवनात सामाजिक बदल झालेला आहे.

४. महानुभाव पंथीय समाज सुधारलेला आहे.

५. चक्रधर स्वामींचे विचार परिवर्तनवादी आहे.

नुमना निवड पद्धती :

कोणत्याही समाजशास्त्रीय अध्ययनामध्ये विशिष्ट नमुन्याची निवड करणे व त्या आधारे माहितीचे संकलन करणे त्यासाठी नमुना निवडीच्या तंत्राचा आधार घ्यावा लागतो. महानुभाव पंथाचे महानुभव पंथाचे समजस्त्रीय अध्ययन विशेष संदर्भ जालना जिल्हा या विषयी संशोधन करण्यासाठी गैरसंभाव्यता नमुना निवड पद्धतीचा उपयोग केला जाणार आहे. मराठवाडा विभागात आठ जिल्हे आहेत. छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, लातुर, परभणी, धाराशिव, हिंगोली, आणि नांदेड यातुन जालना जिल्हयाची निवड संशोधन कार्याकरिता करण्यात आलेली आहे. जालना जिल्हयातुन यादूच्छिक पद्धतीद्वारे प्रत्येकी २५ उत्तरदात्याची निवड प्रस्तुत संशोधनासाठी केली जाणार आहे. संत, साध्वी, अनुयायी हे या संशोधनाचे जणसंख्या होत. एकुण २०० उत्तरदात्याकडून वस्तुनिष्ठ व सत्य माहिती प्राप्त करुन घेण्याच्या दृष्टीने दक्षता घेण्यात येईल. गैरसंभाव्यता नमुना निवडतील सहेतूक नमुना निवड या प्रकाराचा उपयोग केला जाणार आहे.

संशोधन आराखडा :

निष्कर्षांची संशोधन उद्दिष्टे यांच्या संबंधित संशोधनकार्य व मित्तव्ययता याची सांगड घालता येईल. अशा प्रकारे तथ्यांची नियोजित व्यवस्था म्हणजे संशोधन आराखडा होय. संशोधन कार्य वस्तुनिष्ठ होण्यासाठी संशोधन आराखडा महत्वाचा असतो.

प्रस्तुत संशोधनकार्य गतिमान व्हावे आणि या अभ्यासातून येणारे अनुमान आणि निष्कर्ष अचूक असावे म्हणून विश्लेषणात्मक संशोधन आराखडा वापरण्यात येईल.

तथ्य संकलन पद्धती :

नमुना निवड झाल्यानंतर संशोधकाला निवडलेल्या नमुना घटकांकडून माहिती संकलित करावी यासाठी निरीक्षण प्रश्नावली मुलाखत अशा तंत्राचा वापर करावा लागतो संशोधन समस्या माहिती संशोधक प्राथमिक व दुय्यम सामग्रीतून मिळू शकतो.

प्राथमिक स्त्रोत : महानुभव पंथीयांचे समाजशास्त्रीय अध्ययन: विशेष संदर्भ जालना जिल्हा

१. या प्रस्तुत संशोधन विषयासाठी तथ्य संकलनाच्या प्राथमिक स्त्रोतांची निवड केली आहे. तथ्य संकलनाचे साधन म्हणुन मुलाखत, निरीक्षण व प्रश्नावली या तंत्राचा उपयोग करण्यात येईल.

२. **दुय्यम स्त्रोत** : प्रस्तुत संशोधनामध्ये विषयाच्या अनुषंगाने पुस्तके, प्रकाशित व अप्रकाशित लेख, वर्तमानपत्रे, अहवाल, साप्ताहिक, मासिक, इंटरनेट, नियतकालिके, पी.एच.डी.चे प्रकाशित प्रबंध, ऐतिहासिक कागदपत्रे ऐतिहासिक ग्रंथ, दृष्टांत पाठ, स्मृतीस्थळ, सुत्र पाठ या सर्व ग्रंथाचा आणि प्रकाशित लेख

व शासकिय दस्ताऐवज यासंबंधी माहितीसाठी वरील साधनांचा वापर करण्यात येईल.

दुय्यम स्त्रोताव्दारे प्राप्त तथ्य अध्ययन विषयांच्या संबंधात प्राथमिक आणि सुक्ष्म स्वरुपाची माहिती देतात. त्यामुळे विषयाची ऐतिहासिक पार्श्वभूमी स्पष्ट होते. प्रस्तुत संशोधनासाठी मराठवाडयातील जालना जिल्हयाची माहिती संकलित केली जाणार आहे.

निष्कर्ष व शिफारशी :

संशोधनात प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे विषयाचे उद्दिष्टे व गृहित कृत्ये तपासून योग्य ते निष्कर्ष काढून आवश्यक त्या सुचना करण्यात येणार आहेत.

मर्यादा :

संशोधकाने संशोधनासंदर्भातील माहितीची व्याप्ती स्पष्ट केली आहे. संशोधनाच्या व्याप्ती बरोबर संशोधनाच्या काही मर्यादा ही असतात. यामध्ये संशोधक राज्यस्तरावर संशोधन करू शकत नाही. त्याकरीता संशोधकाने संशोधनाचे अभ्यास क्षेत्र हे जालना जिल्हयातील आश्रम, मठ, मंदिरे, संत, महंत, गृहस्थ, संत साध्वी असणार आहेत. संशोधकाच्या संशोधनातुन काढण्यात येणारे निष्कर्ष हे महाराष्ट्र व मराठवाडयातील महानुभाव पंथाला लागु पडणार आहे.

प्रकरण रचना :

प्रकरण १ : प्रस्तावना

प्रकरण २ : संशोधन पद्धती व साहित्य सर्वेक्षण

प्रकरण ३ : संबंधित साहित्य व गतसंशोधनाचा आढावा

प्रकरण ४ : संत श्री चक्रधर स्वामींचे जीवनचरित्र

प्रकरण ५ : संत श्री चक्रधर स्वामींच्या सामाजिक विचारांचा आढावा

प्रकरण ६ : संत श्री चक्रधर स्वामींचे मानवतावादी विचार

प्रकरण ७ : संख्यात्मक माहितीचे विश्लेषण

संदर्भ ग्रंथ सुची :

१. लिळा चरित्र — डॉ.कोलते.वि.भी.प्रशाकिय प्रत पुणे १९८२

२. सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामी — प्रा.पुरुषोत्तम नागपुरे जुन २००२

३. मध्ययुगीन साहित्यविषयी — डॉ.सतिष बडवे, मीरा बुक पब्लिकेशन २०१०

४. सामाजिक संशोधन पद्धती व तंत्रे — प्रदिप आगलावे साईनाथ प्रकाशन नागपुर.

५. श्री चक्रधर चरित्र — शिक्षण व सेवा विभाग महाराष्ट्र शासन मुंबई १९८२

६. महानुभव संशोधन खंड १ — वि.भी.कोलते, अरुण प्रकाशन मलकापुर

७. दृष्टांत पाठ — डॉ.यु.म.पठाण, चिन्मय प्रकाशन औरंगाबाद २००४

८. पाचभक्ती संप्रादाय — र.रा.गोसावी, मोघे प्रकाशन पुणे, कोल्हापुर १९७४

९. महदंबेचे धवळे — महदंबा

१०. स्मृतीस्थळ — रा.गो.तळपुळे

११. लिळा चरित्र — माहिमभट्ट

१२. महानुभाव तत्वज्ञान — कोलते.वि.भी

संशोधक	संशोधन मार्गदर्शक
मनिषा गजाननराव अंबिलवादे	डॉ.एम.एम.गायकवाड
एम.ए.एम.एड	(सहाय्यक प्राध्यापक)
	स्माजशास्त्र, विभाग प्रमुख
	स्वामी विवेकानंद महाविद्यालय,
	मुक्रमाबाद, ता.मुखेड जि.नांदेड

प्रा.डॉ.मारोती मल्हारी गायकवाड
समाजशास्त्र विभाग प्रमुख व संशोधन मार्गदर्शक,
स्वामी विवेकानंद महाविद्यालय, मुक्रमाबाद
ता.मुखेड जि.नांदेड
मो.नं.९४२१८४०३८०
E-mail : marotigaikwad2@gmail.com

दिनांक: / /

प्रति,

मा. उपकुलसचिव,
शैक्षणिक (मान्यता) विभाग
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,
नांदेड

विषय :— **मार्गदर्शक म्हणून सहमती स्विकारणे बाबत..**

महोदय,

वरील विषयी विनंती की, मानव्य विद्याशाखे अंतर्गत समाजशास्त्र या विषयात **मनिषा गजाननराव अंबिलवादे** या माझ्याकडे पीएच.डी. संशोधन कार्य करू इच्छितात. त्यांच्या संशोधन कार्यास मी मार्गदर्शन करण्यात तयार आहे.

तरी मा. साहेबांनी माझी मार्गदर्शक म्हणून सहमती स्विकारून सहकार्य करावे ही नम्र विनंती.

आपला विश्वासू

डॉ.एम.एम.गायकवाड
(सहाय्यक प्राध्यापक)
समाजशास्त्र, विभाग प्रमुख
स्वामी विवेकानंद महाविद्यालय,मुक्रमाबाद
ता.मुखेड जि.नांदेड

प्रा.डॉ.मारोती मल्हारी गायकवाड

समाजशास्त्र विभाग प्रमुख व संशोधन मार्गदर्शक,
स्वामी विवेकानंद महाविद्यालय, मुक्रमाबाद
ता.मुखेड जि.नांदेड
मो.नं.९४२१८४०३८०
E-mail : marotigaikwad2@gmail.com

दिनांक: / /

प्रति,

मा. उपकुलसचिव,
शैक्षणिक (मान्यता) विभाग
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,
नांदेड

विषय :— पीएच.डी.(समाजशास्त्र) संशोधन आराखडा स्विकारणे बाबत

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरून विनंती अर्ज सादर करण्यात येते की, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथे दिनांक ०८.१२.२०२२ रोजी संपन्न झालेल्या RAC च्या बैठकीमध्ये मानव्य विद्याशाखे अंतर्गत समाजशास्त्र या विषयात **मनिषा गजाननराव अंबिलवादे** या माझ्याकडे **महानुभाव पंथीयांचे समाजशास्त्रीय अध्ययन: विशेष संदर्भ जालना** जिल्हा या विषयावरील संशोधन आराखडा सादर करीत आहेत.

तरी मा. साहेबांनी सदरील संशोधन आराखडा स्विकारावा ही नम्र विनंती.

आपला विश्वासू,

डॉ.एम.एम.गायकवाड
(सहाय्यक प्राध्यापक)
समाजशास्त्र, विभाग प्रमुख
स्वामी विवेकानंद महाविद्यालय, मुक्रमाबाद
ता.मुखेड जि.नांदेड